N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** कळमनुरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0545 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/10/2025 23:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 06/10/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/10/2025
**Time From (वेळेपासून):** 15:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/10/2025 **Time (वेळ):** 22:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/10/2025 22:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय परीसरात, कळमनुरी ,कळमनुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश हनमनंलु मलपिलु

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्र विभाग, हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्र विभाग, हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** पोलीस अधिकारी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8485070037

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रावसाहेब नामदेव पाईकराव | | | 1. घोडा,कळमनुरी,अखाडा बाळापूर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सोनबा पंडीतराव पतंगे | | | 1. घोडा,कळमनुरी ,अखाडा बाळापूर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकार तर्फे फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली. दिनांक 08/10/2025 मी, राजेश हनमंलु मलपिलु, वय 41 वर्षे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.मो.नं.8485070037 सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, जुन 2025 पासून पोलीस निरिक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे. मी दि.06.10.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना तक्रारदार अभिषेक अवधुतराव पंतगे, वय 21 वर्षे व्यवसाय शिक्षण, रा. घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली यांनी तक्रार दिली की, माझे वडीलाचे नावे आमचे घोडा गावात जुने घर असून त्याचा घर क्र.92/क आहे. त्या जागेवर पंचायत समिती कळमनुरी कडून प्रधानमंत्री घरकुल आवास योजना सन 2025-2026 अंतर्गत माझे वडीलांचे नावे घरकुल मंजुर झाले आहे. त्या घरकूलाचे बांधकाम करण्यासाठी यापुर्वी माझे वडीलाचे दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.शाखा आखाडा बाळापुर ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील बॅक खाते क्र. 001311002010577 वर दिनांक 01.08.2025 रोजी पहीला हप्ता 15,000/- जमा झाला आहे. सध्या माझे घराचे बांधकाम सुरू असून दुसरा हप्ता मिळणे बाकी आहे. घरकुलाचा दुसरा हप्ता मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या संयुक्त नजर पाहणी अहवालावर माझे वडीलांनी सही करून ते पुण्याला खाजगी कामानिमित्त निघुन गेले असून घरकुलाचे काम पुर्ण करून घेण्यास मला सांगीतले आहे.

दुसरा हप्ता बॅक खात्यावर जमा करण्या अगोदर संयुक्त नजर पाहणी अहवालावर सरपंच किंवा उपसरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसेवक यांची सही आवश्यक असते, त्यांची या अहवालावर सही झाल्यानंतर ग्रामपंचायती मार्फत अहवाल पंचायत समिती येथे पाठविला जातो व त्यानंतर दुसरा हप्ता बॅक खात्यावर जमा केला जातो, त्याकरीता मी आज दि.06.10.2025 रोजी सकाळी 09.00 वा. सुमारास, माझे बांधकाम घरकुलाचा दुसरा हप्ता 70,000/-रू. मिळविणे कामी संयुक्त पाहणी अहवालावर सही घेण्यासाठी आमचे गावचे सरपंच रावसाहेब नामदेव पाईकराव यांना जावून भेटलो. त्यावेळी सरपंच पाईकराव यांनी मला या कामासाठी आमच्या गावातील खाजगी ईसम सोनबा पंडीत पंतगे यांना भेटण्यासा सांगितले. सोनबा पंतगे हे आमच्या गावातील ग्रामपंचायतीचा सदस्यही नाही किंवा कर्मचारीही नाही. मी संरपंचानी सांगीतल्यामुळे लगेच सोनबा पंतगे यांना जाउन भेटलो असता, सोनबा पंतगे यांनी संयुक्त नजर पाहणी अहवालावर सरपंच यांची सही घेवुन, पुढे अहवाल पाठविणे व घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी 5,000/-रू. दयावे लागतील असे सांगून 5,000/-रू लाचेची मागणी केली आहे. सोनबा पंडीत पंतगे हे मला मागत असलेले 5,000/-रू. लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. त्यांना लाच देण्याची माझी अजीबात ईच्छा नाही. परंतु, सोनबा पंडीत पंतगे यांना मी पैसे दिले नाही तर, ते आमच्या घरकुल संयुक्त पाहणी अहवालावर सही मिळवून देणार नाहीत तसेच आमचे घरकुलाचा दुसरा हप्ता मिळण्यासाठी अडचण होईल म्हणून मी नाईलाजास्तव त्यांना लाच देण्यास होकार दिला आहे. त्यांचेशी माझी कोणतीही दुश्मनी किंवा उसणे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही. सोनबा पंडीत पंतगे यांच्याकडे देण्यासाठी 5,000/- रू. मी माझे बचतीतुन सोबत आणले आहेत, तरी सोनबा पंडीत पंतगे यांनी किंवा त्यांचे मार्फतिने इतर कोणी माझे कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे. अशा आशयाची तक्रार दिली होती. सदरचे तक्रारी वरुन कारवाईचे अनुषगाने भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच 1) महादेव किसन वैरागड, वय 42 वर्षे, पद- शिपाई, भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली रा. बाभुळगाव ता.जि.वाशिम. ह.मु. शिक्षक कॉलनी अकोला बायपास ता.जि.हिंगोली., 2) सचिन बापुराव ठाकरे, वय 39 वर्षे पद, लिपीक, भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली रा. महाकाली नगर, अकोला रोड हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.06.10.2025 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार पंचानी वाचुन

पाहिली असता तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर आम्ही, पडताळणी पथकातील पोह श्री फुपाटे, पोशि श्री पुंडगे, तक्रारदार व नमुद दोन्ही पंच शासकिय वाहन क्र.एम एच 33 सि 279 ने अ.सी.बी.कार्यालय, हिंगोली येथुन निघुन हिंगोली ते कळमनुरी जाणारे मेन रोडने निघुन कळमनुरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागील बाजुस पोहचलो.

त्यानंतर आमच्या सुचनेवरून पोह श्री फुपाटे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर व वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती देवुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून आमचे व दोन्ही पंचाचे वक्तव्य व्हॉईस रेकॉर्डरद्वारे नविन मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले व तक्रारदार श्री पतंगे यांचे अंगातील शर्टच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकावुन देवुन, तक्रारदार व पंच क्र.1 श्री वैरागड यांना सरपंच रावसाहेब पाईकराव व खाजगी ईसम सोनबा पतंगे यांची पंचायत समिती कार्यालय कळमनुरी येथे भेट घेण्यासाठी पाठवितांना, तक्रारदार यांनी तक्रार देताना सोबत आणलेले, घरकुलाचे संयुक्त नजर पाहणी अहवालाचे कागदपत्रे तक्रारदार यांच्या सोबत देवुन रवाना केले. त्यानंतर तक्रारदार श्री पतंगे व पंच क्र.1 श्री वैरागड असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोह फुपाटे यांनी तक्रारदार श्री पतंगे यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री पतंगे पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांची पंचायत समिती कळमनुरी येथे गट विकास अधिकारी यांच्या दालना समोर सरपंच रावसाहेब पाईकराव व खाजगी ईसम सोनबा पतंगे यांची भेट झाली त्यामध्ये सरपंच पाईकराव यांनी तक्रारदार यांना, ते तिकडं सोनबा हयं भेट तिकडं...आता आला ते त्याच्यापाशी देवून टाक,असे म्हणुन अस्पष्ट लाचेची मागणी केली व खाजगी इसम सोनबा पतंगे यांना भेटण्यास सांगितले. त्यावरुन तक्रारदार खाजगी इसम सोनबा पतंगे यांना भेटले असता, खाजगी ईसम पंतगे यांनी तक्रारदार यांच्याकडुन त्यांच्या वडीलाचे घरकुलाचे कागदपत्रे घेतले व तक्रारदार यांनी माझे काम कराना हो असे विनंती केली असता, हो करतोन..पैसे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना किती देवु..हो किती सांगा तुम्ही.. पैसे किती लागतील असे विचारले असता, खाजगी ईसम सोनबा पंतगे यांनी बांधायचं नसलं ओ तर दहा हजार, बांधायच असल तर पाच हजार... असे म्हणुन खाजगी ईसम सोनबा पंतगे यांनी तक्रारदार यांचेकडे 5,000/- रू. लाचेची मागणी करुन तक्रारदार पतंगे यांच्याकडुन 5,000-/ रुपये लाच मागणी करुन ती स्विकारण्यास संमती दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता, त्यावेळी त्यांनी पंच क्र. 1 प्रमाणे हकीकत सांगितली आहे. त्यानंतर आम्ही, पंच व पडताळणी पथकालील सदस्य असे तक्रारदार, सरपंच पाईकराव व खाजगी ईसम सोनबा पतंगे यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचानामा करण्यात आला आहे. सरपंच रावसाहेब पाईकराव यांनी तक्रारदार यांना, खाजगी ईसम सोनबा पंतगे यांना भेटण्यास सांगुन ते त्याच्यापाशी देवून टाक म्हणुन अस्पष्ट लाचेची मागणी केली. तसेच खाजगी ईसम सोनबा पतंगे यांनी, तक्रारदार अभिषेक पतंगे यांना, त्यांचे वडील अवधुतराव पतंगे यांच्या, मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता बँक खात्यावर जमा करण्याअगोदर, लागणारा संयुक्त नजर पाहणी अहवालावर सही करुन पुढे, अहवाल पाठविण्यासाठी व घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवुन देण्यासाठी 5,000/- रू. लाचेची मागणी करून, लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले. तसेच सरपंच पाईकराव यांनी तक्रारदार यांचेकडे अस्पष्ट लाचेची मागणी केल्यामुळे, दि.07.10.2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्याकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 सोबत सरपंच पाईकराव यांच्याकडे मौजे घोडा यागावी पाठवुन त्यांची लाचेची मागणी आहे काय? याची पडताळणी केली असता, पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार त्यांना म्हणाले ते तुम्ही मणले आपल सोनबा बाळु त्यायला भेट, त्याला भेटलो मी, ते आता कस आता ते मणायलेत की, बवा घर बांधायच असल तर, पाच हजार रूपये दया, नाही बांधायच असल असत तर, दहा हजार दया, त आता कस करू, तेव्हा सरपंच पाईकराव हे तक्रारदार यांना म्हणाले, तुम्ही ते ठरवान कोणत करायच बांधकाम करत असाल, तोपर्यत पाच दया.. जर समजा..नाही बांधत असाल तर मग...पुन्हा पाच दयायचे, बांधकाम करायच मणल तर पाच दया अस असे म्हणाले, तेव्हा तक्रारदार बर...बर देवु का मग असे त्यांना म्हणाले असता, सरपंच पाईकराव हो देवुन टाक सोनबाला बोललेलो हाव, असे म्हणुन तक्रारदार पतंगे यांच्याकडुन 5,000-/ रुपये लाच मागणी करुन खाजगी ईसम सोनबा पतंगे यांच्या मार्फतीने स्विकारण्यास संमती दिली असल्याचे पंच क्र. 1 यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता, त्यावेळी त्यांनी पंच क्र. 1 प्रमाणे हकीकत सांगितली आहे. त्यानंतर आम्ही, पंच व पडताळणी पथकालील सदस्य असे तक्रारदार, सरपंच पाईकराव यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचानामा करण्यात आला आहे.

तक्रारदार अभिषेक पतंगे यांना, त्यांचे वडील अवधुतराव पतंगे यांच्या, मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता बँक खात्यावर

जमा करण्याअगोदर लागणारा, संयुक्त नजर पाहणी अहवालावर सही करुन पुढे अहवाल पाठविण्यासाठी व घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवुन देण्यासाठी स्वतः सरपंच रावसाहेब पाईकराव यांनी खाजगी ईसम सोनबा पतंगे यांच्या मार्फतीने 5,000/- रू. लाचेची मागणी करुन लाच रक्कम खाजगी ईसम सोनबा पतंगे यांच्या मार्फतीने स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी तक्रारदार यांच्याकडुन सापळा कारवाईमध्ये वापरयाची 5,000/- रुपये ताब्यात घेतली.

त्यावरुन दि.08.10.2025 रोजी सरपंच पाईकराव व खाजगी ईसम सोनबा पतंगे यांच्या विरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, सरपंच पाईकराव हे त्यांच्या कोर्टाच्या कामासाठी छत्रपती संभाजी नगर येथे गेले असल्याने त्यांची भेट होणार नाही व खाजगी ईसम सोनबा पतंगे यांची पंचायत समिती कळमनुरी येथे भेट होईल असे सांगितले.त्यानंतर सापळा कारवाईसाठी आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस उप अधिक्षक श्री विकास घनवट, पोह श्री फुपाटे, पोशि श्री. पुंडगे, पोशि श्री. वाघ व सपोउपनि शुक्ला, मोहमद सिद्दीकी, तक्रारदार पतंगे, असे शासकीय वाहन व शासकिय मोटार सायकलने कळमनुरीकडे रवाना होवुन जिल्हा परिषद प्रशाला कळमनुरी समोरील मुख्य रस्त्याच्या बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर सापळा पुर्व कारवाईला सुरवात झाली. पोह अकबर यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती दिली व प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. खाजगी ईसम सोनबा पतंगे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांने लाच रक्कम स्विकारल्याबाबत ठरल्याप्रमाणे ईशारा करण्याचे तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर पोह अकबर यांनी लाच रक्कमेला अँन्थ्रॉसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्याकडे 14.17 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांच्यासोबत खाजगी ईसम सोनबा पतंगे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय कळमनुरी येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच क्रं.2 श्री ठाकरे असे तहसिल कार्यालयाकडे रवाना झालो व तहसिल कार्यालय परिसराच्या आवारात सापळा पथकाने कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.

अंदाजे 14.40 वाजता तक्रारदार यांच्याकडुन खाजगी ईसम सोनबा पतंगे यांनी पंच व सापळा पथकासमक्ष स्वतः लाच रक्कम 5,000/- रु स्विकारली. त्यावेळी आम्ही खाजगी ईसम सोनबा पतंगे यांना आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय करुन देवुन खाजगी ईसम यांनी स्विकारलेली अँन्थ्रॉसिन पावडर युक्त 5,000/- लाच रक्कम हस्तगत केली आहे. सदर सापळा कार्यवाहीचा सविस्तर पंचानामा केला आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन सविस्तर तक्रार पडताळणी व सापळा कारवाई पंचनामे करण्यात आलेले आहेत.

तरी तक्रारदार श्री. अभिषेक अवधुतराव पतंगे वय 21 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली यांनी दि.06.10.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन दि. 06.10.2025 व दिनांक.07.10.2025 रोजी केलेल्या पडताळणी पचंनामा व दि.08.10.2025 रोजी केलेल्या सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक 1) रावसाहेब नामदेव पाईकराव पद-सरपंच ग्रामपंचायत घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली रा. घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली यांनी तक्रारदार अभिषेक पतंगे यांना, त्यांचे वडील अवधुतराव पतंगे यांच्या, मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता बॅक खात्यावर जमा करण्याअगोदर, लागणारा संयुक्त नजर पाहणी अहवालावर सही करुन पुढे, अहवाल पाठविण्यासाठी व घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवुन देण्यासाठी 5,000/- रू. लाचेची मागणी करून, लाच रक्कम खाजगी ईसम सोनबा पंडीतराव पतंगे यांच्या मार्फतिने स्विकारण्यास सहमती देवुन प्रोत्साहन दिले.

तसेच आरोपी 2) खाजगी ईसम सोनबा पंडीतराव पतंगे वय 42 वर्षे व्यवसाय शेती व दुध डेअरी चालक रा. मु. पो.घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली यांनी तक्रारदार अभिषेक पतंगे यांना, त्यांचे वडील अवधुतराव पतंगे यांच्या, मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता बॅक खात्यावर जमा करण्याअगोदर, लागणारा संयुक्त नजर पाहणी अहवालावर सही करुन पुढे, अहवाल पाठविण्यासाठी व घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवुन देण्यासाठी सरपंच रावसाहेब पाईकराव यांच्याकरीता 5,000/- रू. लाचेची मागणी करून, सापळा कारवाई दरम्यान 5,000/- लाच रक्कम स्वतः स्विकारली.

म्हणुन माझी आरोपी लोकसेवक 1) रावसाहेब नामदेव पाईकराव पद सरपंच ग्रामपंचायत घोडा ता.कळमनुरी जि. हिंगोली रा. घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली., आरोपी 2) खाजगी ईसम सोनबा पंडीतराव पतंगे वय 42 वर्षे व्यवसाय शेती व दुध डेअरी चालक रा. मु.पो.घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली यांच्या विरुध्द कलम 7, 7(अ),12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank (पद):** Dy. SP (Deputy Superintendant **No.(क्र.):** DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला).

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Premprakash marot
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

PSI
पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.कळमनुरी